म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ८/२०२२
उषा मोर्य वि. सुनील मोर्य
(CNR NO.MHWR06-000310-2022)

## निशाणी क्र.१ वर आदेश
## (पारीत दि. २६.०९.२०२२)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने गैरअर्जदारा विरुध्द महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम २३ नुसार दाखल केला असून त्यामध्ये कलम १९ नुसार गैरअर्जदाराने त्याचे हिंगणघाट येथील राहते घर विकू नये असा अंतरीम आदेश व कलम २० नुसार दरमहा रु.३०,०००/– अंतरीम खावटी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथनानुसार तिचे व गैरअर्जदाराचे लग्न दि. २८.०७.२००७ रोजी हिंगणघाट येथे जातीचे रितीरिवाजाप्रमाणे झाले आहे व लग्नानंतर ती गैरअर्जदाराच्या किरायाचे घरी हिंगणघाट येथे नांदावयास गेली. गैरअर्जदाराने सुरुवातीचे काही दिवस अर्जदाराला चांगले नांदविले व त्यानंतर तो तिच्या चारीत्रयावर संशय घेवू लागला व क्षुल्लक कारणावरुन तिच्यासोबत भांडण करु लागला. त्यानंतर अर्जदाराचे भावाने गैरअर्जदाराला घर क्र. ३९ विकत घेवून दिले व सदरचे घर अर्जदाराचे नावावर असतांना देखील गैरअर्जदाराने तिला हाकलून दिले आहे. त्यानंतर तिने महिला तक्रार निवारण केंद्र हिंगणघाट येथे तक्रार दिली. तेथे गैरअर्जदाराने तिच्या भावाने दिलेले घर तिला परत देईल असे हमीपत्र लिहून दिले. गैरअर्जदार हा पेटींग चे काम करतो व ॲटो चालवितो. सदरचे व्यवसायातुन त्याला वार्षिक ३ लाख उत्पन्न मिळते. अर्जदार व तिच्या आई वडिलांची परिस्थिती गरीबीची आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराला तिचे घरातुन काढून दिल्यामुळे तिला राहण्यासाठी दुसरे कोणतेही ठिकाण नाही अशा परिस्थितीत तिला गैरअर्जदाराकडून घर परत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अर्जदाराला नाईलाजाने तिच्या आई व मुलासोबत ४ x ४ च्या एका खोलीमध्ये राहावे लागत आहे. गैरअर्जदाराला अर्जदाराच्या नावाने असलेले घर विकण्यासाठी अडथळा करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अर्जदाराला तिचे आदंनाचे सामान, भेटवस्तु इ. परत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदाराने कलम १९ खाली गैरअर्जदाराचे हिंगणघाट येथील राहते घर व इतर मालमत्ता कोणासही विकू नये असा आदेश मिळण्यासाठी व त्यामध्ये राहण्याचा अधिकार व ताबा मिळण्यासाठी आणि गैरअर्जदाराकडून कलम २० खाली दरमहा रक्कम रु.३०,०००/– अंतरीम खावटी मिळण्यासाठी केला आहे.

३. गैरअर्जदाराने नि.क्र. ५ खाली म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे.

गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे दि. २८.०७.२००७ रोजी अर्जदारासोबत त्याचे लग्न झाल्याचे नाकारले असून अर्जातील नातेसंबंध व सर्व कथने नाकारले आहेत. गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे तो मुळचा मध्यप्रदेश येथील रहिवासी असून सन २००० मध्ये तो हिंगणघाट येथे आला. तो हिंदी भाषीक असून त्याला मराठी बोलता, लिहिता व वाचता येत नाही. गैरअर्जदाराचे घरासमोर अर्जदार राहत होती व त्याचे कडून पैसे घेवून ती तिला जेवणाचा डब्बा पाठवित होती. तत्पूर्वी अर्जदाराचे देवगण चत्रे, रा. धुलीया येथील इसमासोबत लग्न झाले होते व त्या लग्न संबंधातुन तिला दोन मुले व एक मुलगी झाली. गैरअर्जदार हा साधा भोळा स्वरुपाचा व्यक्ती असल्याने व त्याला मराठी भाषेचा ज्ञान नसल्याचा गैरफायदा घेवून अर्जदाराने पतीच्या जागी आधार कार्डवर गैरअर्जदाराचे नाव चढून घेतले आहे. त्याचबरोबर शाळेमध्ये अर्जदाराचे मुलांचे वडीलांच्या जागी गैरअर्जदाराच्या नावाची नोंद करुन घेतली आहे. परंतु गैरअर्जदार हा अर्जदाराचा पती नाही व तीचे मुलांचा वडील नाही. अर्जदाराचे पूर्वीचे विवाह विच्छेदन झालेले नाही. त्यामुळे तिने गैरअर्जदाराला तिचा पती म्हणण्याचा तिला कोणताही हक्क नाही. त्याचबरोबर गैरअर्जदाराची वडिलोपार्जित शेती विकण्यास काढली होती तेव्हा सुध्दा अर्जदाराने गैरअर्जदारावर दडपण आणून तिच्या भावाला पैसे द्या अन्यथा खोटी कार्यवाही करणार व जेल मध्ये टाकणार अशी धमकी दिली होती.

४. सन २००५ मध्ये अर्जदाराचा भाउ सुनील गैरअर्जदाराकडे आला व त्याचे घर विकत घेता का असे म्हटले असता गैरअर्जदाराने त्यास होकार देवून रक्कम रु.२२००/– मध्ये विकत घेतले व सदरचे घराला नगरपरिषद अभिलेखामध्ये नाव चढविणे गरजेचे असल्याचे सांगुन को–या कागदावर सहया घेतल्या व त्यावर अर्जदाराचे नाव घर मिळकतीवर चढवून घेतले. परंतु त्याबाबत गैरअर्जदाराला माहिती नव्हते. परंतु त्याचे विक्रीचे कागदपत्र गैरअर्जदाराजवळ आहे. अर्जदाराने महिला तक्रार निवारण केंद्रामध्ये गैरअर्जदारा विरुध्द खोटी तक्रार दाखल करुन तेथील अधिका–यांना हाताशी धरुन दडपण आणून को–या कागदावर गैरअर्जदाराच्या सहया घेतल्या होत्या. गैरअर्जदार हा हातमजूरी करणारा व्यक्ती असून तो दिवसाकाठी रु.१०० ते २००/– कमवितो व त्याचेवर त्याची पत्नी संगीता व मुलगा पवन यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी आहे. सबब, गैरअर्जदाराने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ कु. मदार मॅडम व गैरअर्जदारातर्फे विद्वान

विधिज्ञ श्री मलनस यांचा युक्तीवाद ऐकला.

६. उभयपक्षाचे युक्तीवादा वरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदाराने अर्जदाराचा कौटुंबीक हिंसाचार केला काय ? | होय. |
| २ | अर्जदार ही निवास व अंतरीम खावटी आदेश मिळणेस पात्र आहे काय असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीता**

७. अर्जदाराने अर्जाच्या समर्थनार्थ नि.क्र. २ खाली तिचे स्वतःचे आधार कार्ड, ग्राहक क्र. ३९६०१०३१०९२१ चे माहे जानेवारी २०२१ चे विज देयक, अदखलपात्र गुन्हा क्र. ३४१/२१ ची प्रत, नि.क्र. ८ खाली मालमत्ता क्र. ३९ भिमनगर वार्ड येथील कराची पावती दि. २५.०२.२०२१ ची प्रत, महिला समुपदेशन केंद्र हिंगणघाट यांचे पत्र दि. २१.०५.२०२१ आणि त्यामधील गैरअर्जदाराचे हमीपत्राच्या प्रमाणीत प्रती दाखल केली आहे. त्याचबरोबर अर्जदाराने नि.क्र. १० खाली तिचा व गैरअर्जदाराचा कुटुंबातील सदस्यांसोबत फोटो दाखल केला आहे.

८. गैरअर्जदाराने नि.क्र. ६ खाली अनोंदणीकृत विक्रीपत्र दि. २९.०३.२००५ ची छायांकित प्रत, गैरअर्जदार, त्याची पत्नी संगीता यांचे आधार कार्ड व राशन कार्डच्या छायाकिंत प्रती व अर्जदाराच्या पतीचे छायाचित्र इ. कागदपत्रे दाखल केले आहेत.

९. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदाराचे व तिचे लग्न दि. २८.०७.२००७ रोजी हिंगणघाट येथे झाले आहे. ती व गैरअर्जदार ज्या घरात राहतात ते घर क्र. ३९

अर्जदाराचे भावाने विकत घेवून दिले होते. याउलट गैरअर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे सन २००५ मध्ये अर्जदाराचा भाउ सुनील हा गैरअर्जदाराकडे आला व त्याने घर विकत घेता का असे म्हटल्यामुळे त्याने त्यास होकार दिला व सदर राहाते घर रक्कम रु.२२००/– मध्ये विकत घेतले ज्यावर अर्जदाराचा भाउ सुनील याची सुध्दा स्वाक्षरी आहे व त्यानंतर नगरपरिषद अभिलेखा मध्ये सदरचे घर गैरअर्जदाराचे नावाने करावयाचे कारणावरुन त्याने को–या कागदावर त्याच्या सहया घेतल्या. अर्जदाराने नि.क्र. ८ खाली मालमत्ता क्र. ३१ ची सन २०१४–१६ ची कराची पावती दि. २५.०२.२०२१ दाखल केली असून त्यावर उषा सुनील मोरे असे नाव नमुद आहे. गैरअर्जदाराने नि.क्र. ६ खाली सदरचे घराचे अनोंदणीकृत विक्रीपत्र दि. २९.०३.२००५ ची छायाकिंत प्रत दाखल केली असून त्यानुसार त्याने भीमनगर हिंगणघाट येथील २० x १५ चौ. फुट इमल्याची जागा नानाजी महादेव कांबळे याचेकडून विकत घेतल्याचे दिसून येते व त्यावर सुरेश ह. जयराज, नानाजी कांबळे व रविंद्र थुल यांच्या साक्षीदार म्हणून सहया दिसून येतात. सबब, गैरअर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे अर्जदाराचा भाउ सुनील या नावाचा सदरचे विक्रीपत्रामध्ये साक्षीदार असल्याचे दिसून येत नाही. त्याचबरोबर गैरअर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे अर्जदार व तिच्या भावाने त्याला फसवून अर्जदाराचे नाव नगरपरिषद अभिलेखाला लावले असल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे अर्जदाराने त्याला फसविले आहे. परंतु असे असतांना देखील त्याने अर्जदारा विरुध्द आजतागायत कसलाही दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही केल्याबाबतचे कसलेही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले नाही. सबब, घर मिळकत क्र. ३१ वर अर्जदाराचे नाव आहे ही बाब गैरअर्जदाराने मान्य केली आहे.

१०. अर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे तिचे व गैरअर्जदाराचे दि. २८.०७.२००७ रोजी हिंगणघाट येथे जाती रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले आहे. अर्जदाराने नि.क्र. २ खाली तिचे आधार कार्ड क्र. ९८१७३९८००९०९ दाखल केले असून सदरचे आधार कार्ड दि. १.११.२०११ रोजी काढले असल्याचे व त्यावर उषा सुनील मोर्य, भिमनगर वार्ड हिंगणघाट असे नमुद असल्याचे दिसून येते. अर्जदाराने नि.क्र. ८ खाली महिला समुपदेशन केंद्र यांचे पत्र दि. २१.०५.२०२१ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये महिला समुपदेशीका यांचे पत्रानुसार अर्जदार व गैरअर्जदार यांचे बैठकीमध्ये त्यांनी मान्य केले की, त्याने दुसरे लग्न केले व ज्या घरात तो राहत आहे ते घर तिचे भावाने घेवून दिले व ते तिच्या नावावर आहे असे नमुद केले असल्याचे दिसून येते.

त्याचबरोबर सदरचे पत्रा सोबत गैरअर्जदार सुनील मोर्य याचे नावाचे हमीपत्रातील कथनानुसार त्याने असे ठरविले की जे घर माझ्या पतीच्या नावे आहे ते मी दोन महिन्यामध्ये खाली करुन देणार. सदरचे हमीपत्रामध्ये एक टीप नमुद करण्यात आली असून त्यामधील कथनानुसार वरील जो काही मजकूर लिहिण्यात आला आहे तो मी लिहिला नसून माझा मुलगा पवन सुनील मोर्य याने लिहून दिले कारण मला मराठी लिहिता येत नाही, मला ते वाचून दाखविले, मला ते समजले, पुढे मी सही करणार असे त्यात नमुद केले आहे. अर्जदाराने तिचे व गैरअर्जदाराचे लग्न झाल्याबाबतचा कसलाही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. परंतु तिचे म्हणण्याप्रमाणे त्यांचे लग्न दि. २८.०७.२००७ रोजी झाले आहे व लग्नानंतर ती त्याच्या बरोबर उपरोक्त नमुद मालमत्ता क्र. ३१ चे सामायीक घरात (common Sharehold House)राहत होते. त्यामुळे अर्जदाराने जरी लग्नाचा पुरावा दिला नाही तरी तिचे म्हणण्याप्रमाणे ती व गैरअर्जदार हे एक सामायीक घरात राहत असल्यामुळे कौटुंबीक हिंसाचाराचे कायदयानुसार पुर्तता होते. गैरअर्जदाराने नि.क्र. ६ खाली त्याचे, त्याची दुसरी पत्नी संगीता यांचे आधार कार्ड, रेशन कार्ड इ. कागदपत्रे जोडली आहेत. याउलट अर्जदाराचे आधार कार्डवर गैरअर्जदार सुनील मौर्य याचे नाव दिसते. गैरअर्जदाराने नि.क्र. ६ खाली अर्जदाराचे पहिले पतीचा फोटो दाखल केला आहे. परंतु माझे उपरोक्त विवेचनावरुन अर्जदार व गैरअर्जदार हे एक सामायीक घरात पती पत्नी सारखे राहत असल्याबाबतचे अर्जदाराचे कथन आहे. त्यामुळे तीचे पुर्वीचे पती अथवा त्याच्याशी घटस्फोट घेतला किंवा कसे ही बाब प्रस्तुतचे अर्जासाठी संयुक्तीक वाटत नाही.

११. अर्जदाराचे अर्ज कथनानुसार गैरअर्जदाराने तिचा शारिरीक व मानसीक छळ केला आहे. अर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे तो दरसाल रु.३,००,०००/– कमवितो. सबब, त्याने दरमहा रु.३०,०००/– अंतरीम खावटी द्यावी. गैरअर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे तो दररोज रु.१०० ते २००/– कमवितो. अर्जदार व गैरअर्जदाराने नि.क्र. ११ व ११–अ खाली त्यांचे मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र दाखल केले असून त्यामध्ये गैरअर्जदाराने त्याचे मासीक उत्पन्न रु.८०००/– असल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे ती व गैरअर्जदार हे पती पत्नी आहेत. गैरअर्जदाराने सदरचा नातेसंबंध मान्य केला नाही व त्याने दुस–या स्त्रीसोबत लग्न केल्याचा बचाव घेतला आहे. परंतु अर्जदाराचे कथनानुसार व तिने दाखल केलेल्या कागदपत्रानुसार ती व तो पती पत्नी सारखे एक सामायीक घरात राहत होते. त्यामुळे तिला खावटी देण्याची जबाबदारी

गैरअर्जदाराची आहे. गैरअर्जदाराचे दरमहा रु.८०००/– चे उत्पन्न व त्याचे वरील दुसरी पत्नी, मुले इ. जबाबदारी पाहता अर्जदारास रु.१५००/– खावटी मंजूर करणे योग्य राहील. त्याचबरोबर अर्जदाराने दाखल केलेले मालमत्ता क्र. ३१ चे कर पावती वरुन सदरचे घर तिचे नावावर सन २०१४–१५ व २०१५–१६ मध्ये होते ही बााब सकृतदर्शनी दिसून येते. अर्जदाराने सद्यस्थितीत गैरअर्जदाराने सदरचे घर विकू नये अशी विनंती केली आहे. गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदाराने त्याच्या खोटया सहया घेवून तिचे नाव लावून घेतले आहे. सबब, सकृतदर्शनी सदरचे घर अर्जदाराचे नावावर आहे ही बाब गैरअर्जदाराला मान्य आहे. त्यामुळे गैरअर्जदाराने सदरचे घर अन्य कोणत्याही त्रयस्थ इसमास विकू नये असा अंतरीम आदेश करणे योग्य व न्यायोचीत होईल.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>**

१२. माझे मुद्दा क्र. १ व २ निष्कर्षानुसार अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करणे योग्य होईल. म्हणून मी मुद्दा क्र. ३ चे निष्कर्षात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) सदरचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२) गैरअर्जदाराने अर्जदारास दरमहा रक्कम रु. १५००/– हे अर्जदाराच्या निवासासाठी व अंतरीम खावटी म्हणून अर्जाच्या अंतिम निकालापावेतो प्रस्तुतचा अर्ज दाखल दि. ८.०२.२०२२ पासून द्यावे.

३) गैरअर्जदाराने भिमनगर वार्ड येथील मालमत्ता क्र. ३१ हे प्रस्तुत अर्जाचा निकालापावेतो विक्री अथवा त्याचे हस्तांतरण करु नये.

४) गैरअर्जदाराने अर्जदारास अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु.५००/– द्यावे.

Nagesh Prabhakar Deshpande
Digitally signed by Nagesh Prabhakar Deshpande
Date: 2022.12.07 11:04:21 +0530

दिनांकः २६/०९/२०२२

( एन. पी. देशपांडे )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र. ३) हिंगणघाट.

म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ८/२०२२
उषा मोर्य वि. सुनील मोर्य
(CNR NO.MHWR06-000310-2022)

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. File order is same word to word as per original order.

(S. M. Puri)
Stenographer Grade III